दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार , 09 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 147 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज संबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

# ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना अखेरचा निरोप

■ पुणे वृत्तसंस्था

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं गुरूवारी पहाटे गोव्यामध्ये निधन झाले. गोव्यातील डोना पाऊलमधील राहत्या घरी नानांनी अखेरचा श्वास घेतला. पहाटे हृदयविकाराचा झटका आल्यानंतर त्यांना तात्काळ रुग्णालयात हलवण्यात आलं होतं. पण रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली होती. नानांची अनाकलनीय एक्झिट सर्वांच्याच मनाला चटका लावून गेली. नाना पाटेकर यांनी मृत्यूनंतर माझे अंत्यसंस्कार मूळ गावी शेतात करावं, अशी इच्छा अनेकदा बोलून दाखवली होती. त्यांची शेवटची इच्छा म्हणून नानांवर रात्री पुण्यातील त्यांचं मूळ गाव असलेल्या डोणजे गावामध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले गेले. नानांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेण्यासाठी राज्यातील प्रमुख राजकीय नेत्यांसह अनेक मराठी सेलिब्रिटींनीही हजेरी लावली होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यासह अनेक राजकीय नेते नानांचं अंत्यदर्शन घेण्यासाठी पुण्यामध्ये दाखल झाले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नानांच्या पार्थिवाचे दर्शन पुणे विमानतळावर दर्शन घेतले. यावेळी एक घडलेला भावुक क्षण मनाला वेदना करून गेला. मुख्यमंत्री अखेरच्या दर्शनासाठी आले, तेव्हा त्यांना



बिलगुन मल्हार पाटेकर ढसाढसा रडला. यावेळी उपस्थितांच्या डोळ्यातही अश्रू तरळले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दुःखद प्रसंगात पाटेकर कुटुंबीयांचे सांत्वन केलं.

सरकारी प्रोटोकॉलनुसार त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. अंत्यसंस्कारापूर्वी नानांच्या पार्थिवावर असलेला तिरंगा सन्मानाने त्यांच्या कुटुंबीयांकडे सुपुर्द करण्यात आला. सलामी आणि बिगुल वाजवून पोलिसांकडून त्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देण्यात आला. त्यानंतर नाना यांच्या पार्थिवाला त्यांचा मुलगा मल्हार पाटेकर यांनी मुखाग्नी दिला. नानांचं जाणं कोणाचंही मन स्विकारण्यासाठी तयार नव्हतं. त्यामुळे त्यांचं अखेर दर्शन घेण्यासाठी जनसागर लोटला होता. यावेळी चाहत्यांनी आणि त्यांच्या प्रेम करणाऱ्या प्रत्येकांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी जनमानसात एक वेगळं स्थान निर्माण केलं होतं. त्यांची समाजासोबत घट्ट नाळ जुळली होती. नाना पाटेकर यांना गोव्यातील डोना पाउला येथील घरी गुरूवारी पहाटे अचानक अस्वस्थ वाटू लागलं. त्यांना बेशुद्ध अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आलं. मणिपाल रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना वाचवण्यासाठी सुमारे 45 मिनिटे सीपीआर देण्याचा प्रयत्न केला; मात्र उपचारांना प्रतिसाद न मिळाल्याने पहाटे त्यांना मृत घोषित करण्यात आलं.

पहाटे 5.20 मिनिटांनी नानांनी अखेरचा श्वास घेतला. नाना यांनी बॉलिवूड आणि मराठी अशा दोन्ही चित्रपटसृष्टीमध्ये आपल्या अभिनयाची छाप सोडली. नानांच्या अभिनयाचा फक्त एक सामान्य माणूस नाही तर, अनेक सेलिब्रिटी, दिग्गज नेते मंडळी सुद्धा मोठे चाहते आहेत. नानांच्या अशा अचानक जाण्याने चित्रपटसृष्टीत न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.



## मी जे बोलतो ते करूनच दाखवतो ; कुणीही धीर सोडू नये जिथं विषय गंभीर तिथ मी खंबीर शेतकऱ्यांनी हवालदिल होता कामा नये : आ .सुरेश धस

### आ .धस यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यात गटनिहाय शेतकरी पशुपालक,फळबाग उत्पादक, कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या

■ आष्टी प्रतिनिधी

तालुक्यात दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर स्वरूप धारण करीत असल्याने नागरिकांना आणि शेतकऱ्यांना या संकटातून आधार देण्यासाठी शासनाकडे ठोस उपाययोजनांची मागणी करून ती मंजूरच करून घेणार दुष्काळग्रस्तांना आधार देण्यासाठी शासन गंभीर आहे आणि मी पण खंबीर असून शेतकऱ्यांनी हवालदिल होता कामा नये.पशुधनासोबतच फळबाग धारक शेतकऱ्यांसाठी दीड ते दोन लाख रुपये हेक्टर अनुदानाची मागणी करणार असून मी जे बोलते ते करूनच दाखवतो हे सगळ्यांना माहिती आहे. फक्त नागरिकांनी अशा परिस्थितीत स्थलांतर करता कामा नये.तुमच्या हाताला रोजगार कसा मिळेल यावर देखील सरकारला विनंती करणार असल्याचे आ. सुरेश धस यांनी सांगितले. तसेच जनावरांची संख्या मोजता येईल त्याचा फॉर्म्युला मी सरकारला देणार असल्याचे सांगत शेतकऱ्यांच्या मागणीनुसार दिवाळीपर्यंत चारा डेपो आणि त्यानंतर चारा छावण्या सुरू करण्यात येतील,असेही आ.धस यांनी यावेळी आश्र्वासित केले.आष्टी मतदार संघात जिल्हा परिषद गट निहाय दुष्काळी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आगामी उपाययोजनांसंबंधी धस यांनी शेतकरी, पशुपालक,फळबाग उत्पादक, कार्यकर्ते, आणि स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.

आगामी काळात पशुधन कसे जगवावे हा प्रश्न गंभीर झाला आहे.यावर शेतकऱ्यांनी धस यांना दिवाळी पर्यंत चारा डेपो तात्काळ सुरू करण्याची मागणी केली.त्यानुसार दिवाळी पर्यंत चारा डेपो त्यानंतर चारा छावण्या सुरू करण्याची मागणी करणार असून,हे सांगताना मात्र चारा छावण्या करताना प्रत्येक वस्तीनिहाय किमान २०० ते २५० जनावरांची क्षमता असलेली चारा छावणी असाव्यात अशी मागणी आपण सरकार दरबारी करणार आहोत.

#### रोजगार हमीतून मजुरांना काम ; फळबागांसाठी मोठ्या अनुदानाची मागणी

■ या बैठकीत शेतकऱ्यांच्या वतीने दुष्काळाच्या काळात ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला काम मिळावे, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कामे उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.तसेच फळबाग धारक शेतकऱ्यांसाठीही विशेष अनुदानाची मागणी जोर धरत असल्याचे दिसून आले.

#### पशुधनासाठी थेट अनुदानाची मागणी..

■ दुष्काळाच्या काळात पशुपालकांना दिलासा देण्यासाठी मोठ्या जनावरांसाठी प्रमाणात थेट अनुदान मिळावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होताना दिसली याबाबत आपलं घराणं मी नक्कीच शासनाकडे मांडणार असल्याचे आ. धस यांनी सांगितले.

#### दुष्काळग्रस्त आमदारांची समिती स्थापन करण्याची मागणी

■ दुष्काळी परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यासाठी ज्या-ज्या आमदारांना या परिस्थितीची जाणीव आहे, अशा आमदारांची एक समिती स्थापन करण्यात यावी. या समितीची दर आठवड्याला बैठक घेऊन शासनाकडून सुरू असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात यावा. तसेच परिस्थितीनुसार आवश्यक सूचना आणि उपाययोजना सुचविण्याचे काम या समितीमार्फत करण्यात यावे, अशी मागणीही आपण करणार असल्याचे आ. धस यांनी स्पष्ट केले.

#### "मी जे बोलतो ते करूनच दाखवतो ; कुणीही स्थलांतर करू नये"

■ दुष्काळाची परिस्थिती गंभीर असली तरी नागरिकांनी घाबरून जाऊ नये. सुरेश धस आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे शासन दरबारी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार आहोत. "मी जे बोलतो ते करूनच दाखवतो. त्यामुळे या परिस्थितीत कुणीही गाव सोडून स्थलांतर करू नये," गोरगरीब, दीन, दलित,वंचित घटकांच्या या दुष्काळी परिस्थितीत मदतीला धावून जा असेही कार्यकर्त्यांना यावेळी आवाहन आ. सुरेश धस यांनी केले.

जेणेकरून शेतकऱ्यांची चाऱ्याची आणि पाण्याची कुठलीही गैरसोय होणार नाही याची जाणीव या छावणी चालकांना राहील. केसरी कूपन असणाऱ्यांना धान्य पुरवठा कसा परत मिळेल यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू रहातील असे सांगत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत असेही आ.धस यावेळी म्हणाले.

तसेच २०१२ मध्ये फळबागांसाठी फळबाग धारक शेतकऱ्यांचे शिष्ट मंडळ आणि मी दिल्लीला जाऊन त्यावेळी ४५ हजार रुपयांचे अनुदान मिळवून देण्याचे काम केले.आता तब्बल १४ वर्षांचा कालावधी लोटला आहे. वाढलेला उत्पादन खर्च, मजुरी, सिंचन आणि देखभालीचा खर्च लक्षात घेता सध्याच्या परिस्थितीत फळबाग धारक शेतकऱ्यांना हेक्टरी किमान दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत अनुदान मिळावी अशी मागणी मी यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,शिवराजसिंह चौहान,तसेच केंद्रीय मंत्री अमितभाई शाह,यांची फळबाग धारक शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह भेट घेऊन फळबाग धारक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार असल्याचे आ.धस यांनी सांगितले.

## महेश सहकारी साखर कारखान्याचा २६ वा गळीत हंगाम ; १२ ऑक्टोबरला बॉयलर अग्निप्रदीपन

### सोमवारी मान्यवर संतांच्या शुभहस्ते होणार अग्निप्रदीपन

■ आष्टी (प्रतिनिधी)

कडा येथील महेश सहकारी साखर कारखाना लि. कडा साखरच्या सन २०२६-२०२७ च्या २६ व्या. गळीत हंगामाचा शुभारंभ लवकरच होत आहे. या पार्श्वभूमीवर कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ सोमवार, दि.१२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.१५ वाजता कारखाना स्थळावर आयोजित करण्यात आला आहे.

या धार्मिक व औपचारिक सोहळ्याचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र भूषण माजी आमदार भीमराव धोंडे भूषविणार आहेत. प्रमुख



संतांच्या शुभहस्ते अग्निप्रदीपन समारंभ संपन्न होणार असून यावेळी ह.भ.प. विठ्ठल महाराज (गहीनाथगड), ह.भ.प.प्रकाश बोधले महाराज, ह.भ.प.रामकृष्ण रंधवे बापू महाराज,ह.भ.प. बबन महाराज बहीरवाल आणि ह.भ.प.अशोक महाराज भोसले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमास कारखान्याचे चेअरमन डॉ. अजय धोंडे, व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, कार्यकारी संचालक गिरीश झगडे यांच्यासह सर्व संचालक मंडळ,अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित राहणार आहेत.

याप्रसंगी परिसरातील शेतकरी व ऊस उत्पादकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## दुष्काळग्रस्त महाराष्ट्राची केंद्रीय पथकांकडून पाहणी सुरू; ११ सदस्यांचे पथक राज्यात दाखल



■ मुंबई : वृत्तसंस्था

खरीप हंगामातील दुष्काळ आणि पिकांच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे ११ सदस्यांचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्रात दाखल झाले असून, गुरुवारपासून प्रत्यक्ष क्षेत्रभेटींना सुरुवात झाली आहे. दुष्काळग्रस्त भागातील पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि अन्य परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन त्याचे मूल्यांकन पथकाकडून करण्यात येणार आहे.

कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग यांसह संबंधित विभागांतील अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे. कृषी व शेतकरी कल्याण विभागातील पीक विमा विषयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल हे पथकाचे नेतृत्व करीत आहेत. क्षेत्रभेटीसाठी केंद्रीय पथकाचे तीन गट करण्यात आले आहेत. पहिल्या पथकाकडून अहिल्यानगर, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली जाणार आहे. दुसरे पथक छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांत जाऊन पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईचा आढावा घेणार आहे. तिसरे पथक नागपूर, यवतमाळ तसेच लगतच्या टंचाईग्रस्त भागांची पाहणी करणार आहे.

प्रत्यक्ष क्षेत्रभेटीदरम्यान दुष्काळाची तीव्रता, पिकांचे झालेले नुकसान आणि पाणीटंचाईची स्थिती याबाबत संबंधित जिल्हा प्रशासनाकडून माहिती घेण्यात येणार आहे. केंद्र आणि राज्य यंत्रणांमध्ये समन्वय साधून ही पाहणी केली जाणार आहे. जिल्हानिहाय अंतिम कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर पथकाच्या क्षेत्रभेटींचे नियोजन करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष पाहणीतील निष्कर्षांमुळे राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे क्षेत्रीय वास्तव केंद्र सरकारसमोर अधिक ठळकपणे मांडण्यास मदत होणार आहे.

# कलाक्षेत्रातील नटसम्राट काळाच्या पडद्याआड !



**भारतीय चित्रपटसृष्टीचा अभिनय आणि संवेदनशीलतेचा भारदस्त चेहरा ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनामुळे काळाच्या पडद्याआड गेला आहे. नटसम्राट नानांची अशी आकस्मिक एक्झिट धक्कादायक आहे, अशी शोकमग्र भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून नाना पाटेकर यांनी घेतलेली भूमिका कलाक्षेत्रासह, अनेकांना सामाजिक बांधिलकीचा धडा घालून देणारी ठरली आहे. त्यांच्या निधनामुळे कला आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, असे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.**

## नानाची अखेर एक्झिट








### मंत्री ॲड.आशिष शेलार

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील आपल्या अभिनयाने अजरामर ठसा उमटविणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दु:खद आहे. आपल्या दमदार अभिनयाने अनेक भूमिका जिवंत करणाऱ्या नानांनी रंगभूमी, चित्रपट आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीने एक संवेदनशील, करारी, प्रतिभावान आणि अस्सल कलावंत गमावला आहे. महाराष्ट्र शासनानाच्या वतीने देण्यात येणाऱ्या स्वर्गीय राज कपूर विशेष योगदान पुरस्कार २०१३ पुरस्कारासह चित्रपट क्षेत्रातील अनेक पुरस्कारांचे ते मानकरी ठरले होते. मध्यमवर्गीय कामगार मराठी कुटुंबातून पुढे आलेल्या नाना पाटेकर यांनी अपार मेहनत व आपल्या वेगळ्या शैलीने अभिनयात ठसा उमटवला. आमच्या गिरणगावातील एक अस्सल, इरसाल, उत्सव प्रेमी मराठी माणूस आम्ही आज गमावला आहे.नाना पाटेकर यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली! ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो. त्यांच्या असंख्य चाहत्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशा शब्दात सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.



### मंत्री जयकुमार रावल

आपल्या दमदार आणि सहजसुंदर अभिनयाने असंख्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद, धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारे आहे. त्यांच्या निधनाने मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीने केवळ एक महान अभिनेता गमावला नसून, सामाजिक बांधिकीसह माणुसकीची जाण असलेले संवेदनशील व्यक्तिमत्त्वही गमावले आहे, अशा शब्दांत मंत्री जयकुमार रावल यांनी नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण केली.'परिंदा', 'प्रहार', 'क्रांतिवीर', 'खामोशी', 'अग्निसाक्षी', 'नटसम्राट', 'वेलकम' यांसह असंख्य चित्रपटांमधून नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनयाची स्वतंत्र आणि अमीट ओळख निर्माण केली. त्यांच्या प्रत्येक भूमिकेत केवळ अभिनय नव्हता, तर त्या व्यक्तिरेखेतील देशभक्ती, समाजमनाच्या भावना, संघर्ष, वेदना आणि संवेदना अक्षरशः जगण्याची ताकद होती. त्यामुळे नाना पाटेकर हे नाव भारतीय चित्रपटसृष्टीतील अभिनयाचा एक वेगळा मापदंड म्हणून सदैव स्मरणात राहील.पडद्यावर आपल्या अभिनयाने रसिकांच्या मनावर राज्य करणाऱ्या नाना पाटेकर यांनी पडद्याबाहेरही माणुसकीची नाळ घट्ट जपली. शेतकरी, दुष्काळग्रस्त आणि ग्रामीण भागातील गरजू जनतेच्या प्रश्नांप्रती त्यांनी सातत्याने संवेदनशीलता दाखवली. नाम फाउंडेशन च्या माध्यमातून जलसंधारण आणि निसर्ग संवर्धन यात त्यांनी महाराष्ट्रात प्रेरणादायी काम केले. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी केलेले कार्य त्यांच्या मनातील माणुसकी आणि समाजाप्रती असलेली कृतज्ञता अधोरेखित करणारे आहे, असे मंत्री जयकुमार रावल म्हणाले.



### देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

स्नेही, मित्र म्हणून ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे घट्ट ऋणानुबंध राहीले आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीला नानांच्या रुपाने मराठी मातीतील रांगडा, पण तितकाच संवेदनशील असा अभिनेता मिळाला. नाना जितके पडद्यावर मोठे, तितकेच मनाने सुद्धा मोठे होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांनी एक कालखंड दिला. त्यातून प्रामुख्याने एक राष्ट्रभक्त अशीच त्यांची प्रतिमा प्रेक्षकांना भावली. 'क्रांतिवीर' ते 'नटसम्राट' या त्यांच्या प्रवासात जो दमदार आणि कसदार अभिनयाचा पट त्यांनी उभा केला, त्याला तोड नाही. त्यामुळे अभिनेता म्हणून त्यांचे जाणे ही मोठी हानी आहे.नाना जिथे जात तिथे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, स्वभावाचा भारदस्तपणा वातावरण भारून टाकत. नानांचे अस्तित्त्व त्या परिसराला व्यापून टाकत असे. नाना सर्वांशीच हक्काने आणि वडिलकीच्या, मार्गदर्शकाच्या नात्यानं बोलत असत. त्यामध्ये आत-बाहेर असा भाव नसे. त्यामुळे त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधता येत असे. परखडपणा, बेधडकपणा हे स्वभावगुण त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलवणारे ठरले. मी मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांच्यातील हळवा माणूस कायम पाहत आलो आहे. आम्ही जलयुक्त शिवार अभियान हाती घेतले, तेव्हा त्याला पाठिंबा देण्यासाठी स्वतः नाना पुढे आले होते. मकरंद अनासपुरेजी आणि त्यांनी सोबत येत 'नाम फाऊंडेशन'ची स्थापना केली आणि स्वतः शिवारात जाऊन काम केले. शेतकऱ्यांसाठी मदत करणे असो, दुष्काळी कालखंडात मदतीचा हात पुढे करणे असो, नाना कायम अग्रणी राहिले. यंदाही आपण दुष्काळाचा सामना करीत असताना नाना कधीच मागे राहिले नसते, पण ते अचानक सोडून निघून गेले. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. पाटेकर कुटुंबियांच्या, नानांच्या चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक संदेशात म्हटले आहे.



### एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री

रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रात अभिनयाची उत्तुंग शिखरे गाठणाऱ्या, संवादफेकीपासून मुद्राभिनयापर्यंत प्रत्येक बाबतीत स्वतःची स्वतंत्र शैली निर्माण करणाऱ्या व प्रखर सामाजिक जाणिवा जपणाऱ्या नाना पाटेकर यांचे अकल्पित निधन हा चित्रपटसृष्टीसाठी, महाराष्ट्रासाठी आणि वैयक्तिक माझ्यासाठी फार मोठा धक्का आहे. गेल्याच आठवड्यात अनंत चतुर्थीच्या दिवशी नानांच्या पुण्याच्या घरी गणपती दर्शनाच्या वेळेस झालेली भेट ही शेवटची ठरली, अशी शोकभावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त करताना नानांच्या आठवणींना उजाळा दिला.उपमुख्यमंत्री शिंदे आपल्या शोकसंदेशात म्हणाले, नाना पाटेकर हे अभिनयाची एक जिवंत शाळा होते. 'नटसम्राट' चित्रपटातील त्यांचे संवाद आजही प्रेक्षकांच्या कानात घुमतात. चित्रपटाच्या पडद्यावर ते जितके भारदस्त असायचे, तितकेच खऱ्या आयुष्यात ते अत्यंत साधे आणि जमिनीवर असणारे व्यक्ती होते. नाना पाटेकर यांनी 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांसाठी केलेले काम विशेष उल्लेखनीय आहे. संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. समाजातील सामान्य माणसाशी त्यांची नाळ कायम जोडलेली होती. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल त्यांना असलेली तळमळ आणि मदतीसाठी त्यांनी केलेले काम महाराष्ट्र कधीही विसरणार नाही.नाना पाटेकर यांच्यासोबतच्या वैयक्तिक आठवणींना उजाळा देताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पुण्यातील त्यांच्या घरी गणपती दर्शनाला मी दरवर्षी जायचो. नानांचे आदरातिथ्य मनमिळाऊ स्वभाव जवळून अनुभवता यायचा. त्यांच्याशी गप्पा मारणे आणि त्यांचे मार्गदर्शन घेणे हा नेहमीच एक सुखद अनुभव राहिला आहे. आमच्या दरे येथील निवासस्थानी नानांनी भेट दिली होती शेतीची पाहणी केली गाळ उपसण्याच्या कामासाठी देखील ते आले होते. खासगी भेटीत ते माझ्या पाठीवर हात ठेवून "काय क्रांतिवीर..." अशी त्यांनी दिलेली साद आणि ती कौतुकाची थाप मी कधीच विसरू शकत नाही. त्या शब्दांनी जनतेसाठी अधिक काम करण्याची ऊर्जा दिली, अशा शब्दात उपमुख्यमंत्र्यांनी नानांच्या आठवणींना उजाळा दिला.आपल्या कलेचा उपयोग समाजासाठी करणारे ते एक संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते. रंगभूमी, मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी आपल्या दमदार अभिनयाची वेगळी ओळख निर्माण केली. 'नटसम्राट'सारख्या भूमिकेतून त्यांनी अभिनयाची ताकद दाखवून दिली. नाना पाटेकर यांनी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीला दिलेले योगदान आणि त्यांचे सामाजिक कार्य नव्या पिढीला नेहमीच प्रेरणा देत राहील. नाना पाटेकर हे केवळ उत्तम अभिनेते नव्हते, तर त्यांच्या अभिनयातील सहजता, आवाजातील ताकद आणि भूमिकेत पूर्णपणे झोकून देण्याची वृत्ती कायम स्मरणात राहील.नानांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आपल्या अभिनयाने आणि सामाजिक कार्याने त्यांनी निर्माण केलेले स्थान कायम राहील. महाराष्ट्राचा बुलंद, बाणेदार आवाज शांत झाला आहे. मी एक सच्चा, दिलदार मित्र गमावला आहे. ही हानी कधीही भरून न येणारी आहे. त्यांच्यासारखा अभिनेता शतकातून एकदाच जन्माला येतो. काश्मीरमधील मुलांसाठी शाळा सुरू करण्याचं त्यांचं अखेरचं स्वप्न होतं, ते पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. तीच नाना पाटेकर यांना खरी श्रद्धांजली ठरेल. नानांचे कुटुंबीय, मित्रपरिवार आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात सहभागी असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले.



### सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री

भारतीय चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीवर आपल्या अजोड, दमदार अभिनयाचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आणि मनाला चटका लावणारी आहे. त्यांच्या जाण्याने मराठी तसेच भारतीय कलाविश्वाने एक हरहुन्नरी आणि संवेदनशील कलाकार गमावला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या शोकसंदेशात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, "नाना पाटेकर हे केवळ एक उत्कृष्ट अभिनेते नव्हते, तर अभिनयाचा अस्सल आविष्कार आणि संवेदनशील सामाजिक जाणिवांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. रंगभूमीपासून रुपेरी पडद्यापर्यंत आपल्या सहज आणि प्रभावी अभिनयाने त्यांनी अनेक व्यक्तिरेखा अजरामर केल्या. 'नटसम्राट', 'क्रांतिवीर', 'परिंदा' यांसारख्या कलाकृतींमधून त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर उमटवलेली अमीट छाप रसिकप्रेक्षकांच्या मनात सदैव कायम राहील." नाना पाटेकर आणि पवार कुटुंबातील आपुलकीच्या संबंधांचा उल्लेख करताना त्या भावूक झाल्या. "नानांचे आदरणीय अजितदादांशी अतिशय जिव्हाळ्याचे, आपुलकीचे आणि स्नेहाचे संबंध होते. कौटुंबिक सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगात ते नेहमी पाठीशी उभे राहिले. त्यामुळे त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी ही माझ्यासाठी आणि आमच्या संपूर्ण कुटुंबासाठी अत्यंत वैयक्तिक आणि विशेष दुःखद आहे," असे त्या म्हणाल्या."अभिनयातील यशाच्या शिखरावर असतानाही नानांनी आपल्या सामाजिक बांधिलकीचे भान कधीही सुटू दिले नाही. 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून त्यांनी समाजातील वंचित घटक, दुष्काळग्रस्त आणि शेतकरी बांधवांसाठी केलेले कार्य सदैव प्रेरणादायी राहील.कलेचा आणि सामाजिक सेवेचा ध्यास घेतलेल्या या अष्टपैलू, संवेदनशील कलाकाराला भावपूर्ण श्रद्धांजली," अशा शब्दांत सुनेत्रा पवार यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.



### सचिन अहिर, विधानपरिषद उपसभापती

भारतीय चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीवर आपल्या अजोड, जिवंत आणि प्रखर अभिनयाने तब्बल चार दशकांपेक्षा जास्त काळ रसिकांच्या मनावर एकछत्री अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने कलाविश्व पोरके झाले आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एक महान नटच नव्हे, तर समाजाच्या दुःखाशी थेट जोडलेला एक अत्यंत संवेदनशील माणूस आपण गमावला आहे, अशा अत्यंत भावूक शब्दांत विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी समजताच संपूर्ण सांस्कृतिक आणि सामाजिक विश्वात शोकाकुल वातावरण पसरले आहे. त्यांच्या भावपूर्ण आठवणींना उजाळा देताना सचिन अहिर म्हणाले, "नाना पाटेकर हे केवळ पडद्यावरचे कलाकार नव्हते, तर ते अथांग संवेदनशीलतेचे मूर्तिमंत रूप होते. 'नटसम्राट' असो वा 'परिंदा', 'क्रांतिवीर' असो वा 'अपहरण', त्यांनी साकारलेली प्रत्येक भूमिका प्रेक्षकांच्या काळजाचा ठाव घेणारी ठरली. मराठी व हिंदी चित्रपट सृष्टीला डायलॉगच्या माध्यमातून एक वेगळा आयाम दिलेला आहे. त्यांचा भारदस्त आवाज, संवादफेकीची ती आगळीवेगळी शैली आणि डोळ्यांतील ती थेट भिडणारी भाषा मराठी अन् हिंदी रसिकांच्या मनात कायमची कोरली गेली आहे."अभिनेता म्हणून चित्रपटसृष्टीत नावलौकिकत्व मिळाल्यावरही एक सर्वसाधारण माणसाच्या जीवनशैलीत जगणारा लोक कलावंत म्हणून लक्षात राहील. हिंदी चित्रपट सृष्टीतील सुपरस्टार अमिताभ बच्चन यांनी त्यांना एका मुलाखतीत असे विचारले होते की, तुम्ही एवढे सगळे ऐश्वर्य सोडून गाव खेड्यात कष्ट करतात. स्वतःचे काम स्वतःच करतात. हे सगळे कसे जमते. त्यावर नाना पाटेकर असे म्हणाले, माणसाने आपला मूळ स्वभाव व मूळ परिस्थिती कधीच विसरू नये. आपल्याला जीवन जगण्यापुरते जेवढे लागते तेवढेच आपल्याजवळ ठेवावे. ही सर्व समानतेची व मानवतेची भावना आज हरपली आहे. नाना केवळ अभिनयापुरते मर्यादित न राहता नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी शेतकरी मजूर त्यांच्या समस्या शासन दरबारी ठामपणे मांडल्या. आपल्या फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना कायम मदतीचा हात दिला. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या अश्रूंची जाणीव ठेवून त्यांनी उभं केलेलं सामाजिक कार्य हे त्यांच्यातील संवेदनशील माणसाची साक्ष देते, अशी आठवण उपसभापती अहिर यांनी करून दिली. "नानांनी नेहमीच सामान्यांच्या दुःखाला आपलं मानलं. त्यांच्या निधनाने कलाक्षेत्राची कधीही न भरून निघणारी हानी झाली असून, महाराष्ट्र एका कणखर तरीही भावुक व्यक्तिमत्त्वाला पोरखा झाला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या करोडो चाहत्यांना व कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो," अशी प्रार्थना सचिन अहिर यांनी केली.



### डॉ. सामंत : उद्योगमंत्री

ज्येष्ठ अभिनेते, संवेदनशील माणूस, स्पष्टवक्ते व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक बांधिलकी जपणारे माझे जिवलग मित्र नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी मनाला सुन्न करणारी आहे. नानांसोबतचे माझे संबंध केवळ परिचयापुरते किंवा सार्वजनिक जीवनापुरते मर्यादित नव्हते. आमच्यात जिव्हाळ्याचे आणि मनापासूनचे मैत्रीचे नाते होते. माझ्यावर प्रेमाने रागावणारा, चिडणारा एक आपला माणूस आज आपल्यातून निघून गेला, या भावनेने मनाला चटका लागला आहे, अशा शब्दांत उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहिली.ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्यासोबत झालेल्या अनेक संवादांच्या आठवणी जाग्या होत आहेत. त्यांचा परखडपणा, माणसांकडे पाहण्याचा संवेदनशील दृष्टिकोन आणि एखादी गोष्ट मनापासून पटली की त्यासाठी ठामपणे उभे राहण्याची त्यांची वृत्ती कायम स्मरणात राहील, असे डॉ. सामंत यांनी सांगितले. अभिनयाच्या क्षेत्रात नाना पाटेकर यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून कोकणात झालेल्या विविध सामाजिक आणि जलसंधारणाच्या कामांशी त्यांचा असलेला जिव्हाळा आपण जवळून अनुभवला असल्याचे डॉ. सामंत यांनी सांगितले. या कामाच्या निमित्ताने नानांसोबत अनेकदा संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यामुळे आमच्यातील मैत्रीचे नाते अधिक घट्ट झाले. समाजासाठी काहीतरी करण्याची त्यांची तळमळ आणि त्यामागची प्रामाणिक भावना नेहमीच प्रेरणादायी होती. २०२५ मध्ये 'नाम फाउंडेशन'च्या दशकपूर्ती सोहळ्यातही नानांसोबत एकत्र येण्याचा प्रसंग आला होता. त्या वेळी त्यांच्या सामाजिक कार्याची व्यापकता आणि महाराष्ट्रासाठी काहीतरी करण्याची त्यांची धडपड प्रकर्षाने जाणवली, असे डॉ. सामंत यांनी श्रद्धांजलीपर संदेशात म्हटले आहे.

### मंत्री संजय राठोड



ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आणि मन हेलावून टाकणारे आहे. आपल्या दमदार अभिनयाने आणि वैशिष्ट्यपूर्ण शैलीने मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीत अढळ स्थान निर्माण करणारा एक प्रतिभावान कलाकार आज आपल्यातून निघून गेला आहे. त्यांच्या निधनाने कला आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दांत मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी आपल्या प्रभावी अभिनयातून विविध भूमिका अजरामर केल्या. त्यांच्या अभिनयातील सहजता, संवादफेक आणि व्यक्तिरेखेला जिवंत करण्याची विलक्षण हातोटी यामुळे त्यांनी रसिकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले. मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटविला. कलेसोबतच सामाजिक बांधिलकीही त्यांनी तितक्याच संवेदनशीलतेने जपली. 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून जलसंधारण, जलसंवर्धन तसेच शेतकरी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. समाजातील गरजू घटकांच्या प्रश्नांशी जोडून घेत त्यांनी सामाजिक कार्याला दिलेले योगदानही कायम स्मरणात राहील.कलेच्या माध्यमातून रसिकांचे मनोरंजन आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजासाठी योगदान देणारा संवेदनशील कलाकार आपण गमावला आहे. त्यांच्या कार्याची आणि कलाकृतींची आठवण सदैव प्रेरणादायी राहील. जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या कुटुंबीय, आप्तस्वकीय आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात आपण सहभागी असून, हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबीयांना मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना, असे मंत्री संजय राठोड यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# योगासनातून लठ्ठपणा घालवा



वजन कमी करण्याठी योग हा सर्वात महत्वाचा आणि साधा उपाय मानला जातो, योगमधील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, कोणत्याही वयातील लोकांना योग करता येतो, गर्भवती महिलांना देखिल काही गोष्टीत काळजी घेऊन योग करण्याचा सल्ला दिला जातो. तणावामुळे माणसामागे अनेक रोग लागतात. योग केल्याने वजन घटते. तुम्ही फिट राहतात आणि तुमचा आत्मविश्वास देखिल वाढतो. तणावामुळे अनेक आजार वाढतात, मात्र योगाच्या माध्यमातून यातून निश्चितच फायदा होतो. आजारपण दूर ठेवता येते. खाली काही आसनं देण्यात आली आहेत. ज्यामुळे नेहमीच वजन कमी करण्यात मदत होत असते.

## वक्रासन



पाठीवर झोपावे. दोन्ही पाय गुडघ्यात वाकवा व शरीराच्या जवळच उभे करा व दोन्ही पायांमध्ये खांद्याएवढे अंतर ठेवा.दोन्ही हात उचलून तळवे उलटे करून डावा हात डाव्या खांद्याच्या व उजवा हात उजव्या खांद्या खाली सरकवा.श्वास घेत घेत हळुवार खांदे वर उचला. मान सैल सोडा, हात कोपरात व पाय गुडघ्यात सरळ होईपर्यंत कंबर वर उचला. श्वसन संथ चालू ठेवा.

फायदे - आपण व्यवहारात नेहमी पुढे वाकत असतो. त्यामुळे पाठीचा कणाही नेहमी पुढच्या दिशेने अधिकाधिक वाकविला जातो. त्याच्या अगदी नेमकी उलट अवस्था या आसनात होते. त्यामुळे पाठीच्या कण्याची कार्यक्षमता वाढायला या आसनाचा निश्चित उपयोग होतो. पोटाचे, मांड्यांचे, पोटऱ्यांचे स्नायू कार्यक्षम होतात.

### दक्षता

पाठीच्या कण्याचे विकार असणाऱ्या रुग्णांनी हे आसन मार्गदर्शनाशिवाय करू नये.



## पश्चिमोत्तानासन

पश्चिम या शब्दाचा अर्थ पाठीकडची बाजू असाही होतो. या आसनात पायाच्या घोट्यापासून मस्तकापर्यंतचा पाठीचा भाग ताणला जातो. म्हणून याला 'पश्चिमोत्तानासन' असं सार्थ नाव दिलेलं आहे.

कृती - सपाट जमिनीवर पाय पसरून बसावे. पायाचे अंगठे आणि टाचा एकमेकांना जोडून ठेवावे. मान सरळ आणि समोर असावी. कमरेत वाकून हात पावलांकडे न्यावेत. दोन्ही हातांच्या तर्जनींना हुकाप्रमाणे आकार द्यावा व त्या त्या बाजूकडील पायांचे अंगठे अडकवावे. कमरेपासून वरचे शरीर व हात ढिले करावेत. म्हणजे शरीर पुढे व खाली झुकू शकेल. कोप-यामध्ये हात वाकू लागतील. कोपरे जमिनीवर टेकवण्याचा प्रयत्न करावा. मात्र डोक गुडघ्याला टेकवू नये किंवा पायदेखील वर करू नये. अंगठे पकडता आले नाहीत तर घोटे पकडून शक्य तेवढे पुढे झुकावे. संथ श्वास चालू ठेवावा. थोडा वेळ याच स्थितीत बसावं. हळूहळू हाताची पकड सोडत पूर्वस्थितीत यावे.

फायदे - शरीराच्या पाठीकडील बाजूचे स्नायू, विशेषतः मांडीच्या मागील आणि कमरेचे स्नायू जास्त लवचिक बनवतात.पाठीच्या कण्यावरील ताणामुळे तेथील रक्ताभिसरण सुधारतं व मणक्यांतून निघणा-या नाड्या (मज्जातंतू) अधिक कार्यक्षम बनतात.खुरटलेली उंची वाढवण्यास या आसनाचा उपयोग होतो.पोटावर, विशेषतः ओटीपोटावर घनदाब निर्माण झाल्याने तेथील मेद कमी होतो.तरुण वयात निर्माण होणारे वीर्यदोष व तरुण स्त्रियांना जाणवणारा मासिक पाळीच्या अतिरिक्त स्त्रावाचा त्रास या आसनाच्या सरावानं नाहीसा होतो.सायटिका, पाठीची व कमरेची इतर दुखणी या आसनाच्या योग्य व नित्य अभ्यासाने दूर होतात. पचनक्षमता सुधारते.

## भुजंगासन



जमिनीवर पालथे झोपून पाय सरळ ठेवा. पायाची बोटे आणि कपाळ जमिनीला स्पर्श करतील असे झोपा.दोन्ही पाय जुळवून घ्यावेत, तुमची दोन्ही पाउले आणि टाचा एकमेकाला हळूवारपणे स्पर्श होतील याची खात्री करून घ्या.हाताचे तळवे जमिनीवर ठेवून खांद्याखाली घ्या. हाताची कोपरं शरीराला लागून व समांतर असावे. एक दिर्घ श्वास घेऊन हळूवारपणे डोके, छाती वर उचला, पण तुमची नाभी जमिनीवरच असू द्यात.आता, हातांचा आधार घेत तुमचे शरीर जमिनीपासून उचलून मागे टाचेकडे खेचा.

लक्षात ठेवाः तुमच्या दोन्ही तळहातांवर सारखेच वजन असू द्यात पाठीतील प्रत्येक मणका एकामागे एक कमानीत येईपर्यंत, सजग राहून श्वास घेत राहा. जास्तीतजास्त मागे ताणून तुमचे हात सरळ राहतील असा प्रयत्न करा. आता डोके मागे घेऊन हात जमिनीवर सरळ येतील असे पहा.

### लक्षात ठेवा

तुमचे कान तुमच्या खांद्यांपासून दूर आहेत का? खांद्यांना आराम द्या. हाताची कोपरे थोडे वाकवले तरी चालतील. सरावाने तुम्हाला कोपरे सरळ ठेऊन आसनस्थिती सुधारता येईल.तुमचे पाय अजूनही जुळलेले आहेत ना याची खात्री करा. चेहऱ्यावर स्मित कायम ठेवत श्वास घेत राहा.आसनस्थितीत प्रमाणाबाहेर जास्त वेळ राहू नका व सहन होईल एवढाच ताण द्या.श्वास सोडत आपले पोट, छाती व डोके जमिनीवर टेकवा.

### फायदे

खांदा व मानेला मोकळे करते. पोट पुष्ट करते. संपूर्ण पाठ व खांदे सशक्त बनवते. पाठीच्या मधल्या व वरील भागांना लवचिक बनवते. छाती विस्तारते. रक्ताभिसरण सुधारते. थकवा व तणाव कमी करते.

श्वसनमार्गाचे विकार जसे दमा असलेल्या लोकांना फारच उपयुक्त. (परंतू खोकल्याची उबळ आली असता हे आसन करू नये).

### केव्हा करू नये

गरोदरपणात, छातीचे अथवा मनगटाचे हाड मोडल्यास, किंवा नुकतीच एखादी पोटाची शस्त्रक्रिया, जशी हर्निया, झाली असल्यास हे आसन करू नये तुम्हाला कार्पेल टनेल सिंड्रोमचा त्रास होत असेल तर भुजंगासन करू नका.

## धनुरासन



- या आसनात शरीराची अवस्था धनुष्याप्रमाणे होते म्हणून या आसनाला धनुरासन म्हणतात.
- या आसनात शरीराची अवस्था धनुष्याप्रमाणे होते म्हणून या आसनाला धनुरासन म्हणतात. पाठीला किंवा कण्याला गंभीर विकार झाले असतील तर हे आसन करू नये. अल्सर, कोलायटीससारखे पोटांचे विकार असलेल्यांनी हे आसन टाळावे. छातीवर झोपावे. दोन्ही पाय गुडघ्यात वाकवावेत आणि सहा ते सात इंच एकमेकांपासून दूर करावे.
- दोन्ही हातांनी पायाच्या घोटयाजवळ पकडावे. आता श्वास घ्यावा आणि हातांनी पाय व पायांनी हात ओढून वर उचला. संपूर्ण शरीर वर उचला आणि ताणलं जाऊ द्या.
- पाय वर उचलताना पोटऱ्या मांडयापासून लांब नेण्याचा प्रयत्न करा. शरीराची आकृती ताणलेल्या धनुष्यासारखी होईल. अशा स्थितीत किमान 10-30 सेकंद राहा. श्वास संथगतीने सुरू राहू द्या.
- या स्थितीत असताना हाताची पकड जास्तीत जास्त वर घेण्याचा प्रयत्न करावा. म्हणजेच शरीराचा सगळा भार पोटावर येईल. पूर्वावस्थेत येताना, श्वास सोडत सोडत, गुडघे, खांदे, हनुवटी हळूहळू जमिनीवर टेकवा.गुडघ्यात पाय हळूहळू सरळ करा, गुडघे सरळ केल्यावर पूर्वस्थितीला या. थोडया वेळ शरीर शिथिल करा

### फायदे

या आसनामुळे शरीराचे स्नायू दृढ आणि लवचिक होतात. पचनसंस्थेचे कार्य सुधारते. पोट, पाठ, मान, छाती, हात, पाय यांसारख्या अवयवांना एकचवेळी उत्तम आणि योग्य ताणाची स्थिती मिळाल्याने, शरीराला होणारा लाभ वृद्धिंगत होतो. तसेच पाठीचा वक्रदोष नष्ट होतो. कमरेची आणि मानेची दुखणी कमी होतात. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे पोटांचे स्नायू खेचले गेल्यामुळे पोटाची अतिरिक्त चरबी कमी होते. तसेच पाठीचा मणका विशेषतः कुठल्याही दिनचर्येच्या कामात धनुष्याप्रमाणे असा ताणला जात नाही, तो या आसनामुळे ताणला जातो. म्हणून मणक्याची गादी सरकणे, मणके झिजणे आणि कमरेचे स्नायू जखडणे या व्याधींवर अत्यंत लाभदायी म्हणजे हा आसन प्रकार आहे.

## हलासन



कृतीः आधी पाठिवरती झोपावे. दोन्ही पाय एकमेकांना जोडावेत. दोन्ही हातांचे पंजे जमिनीला लावून कमरेला जुळवून ठेवावेत.आता श्वास हळूहळू बाहेर सोडावा. यानंतर दोन्ही पाय सावकाश वरती उचलावे. गुडघे सरळ ठेवत पाय आकाशाच्या दिशेने उंच उचलावेत. पुन्हा पायांना हळूहळू डोक्याच्या मागे नेण्याचा प्रयत्न करावा. अधिक त्रास होत असेल तर, अशा वेळी दररोजच्या सरावानंतर पाय मागे नेण्याचा प्रयत्न करावा. आपल्या कार्यशक्तीनुसारच हा व्यायाम वाढवावा. अन्यथा मानेला त्रास होण्याची शक्यता आहे.

सूचना : मानेचा किंवा पाठीच्या मणक्याचा विकार असलेल्यांनी हा व्यायाम करणे टाळावे. ज्यांना गळ्याचा गंभीर आजार आहे अशा रुग्णांनीही हे आसन करणे टाळावे.

## चक्की चलनासन



योगचं हे आसन पोटाची चर्बी कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. या योगात वजन कमी करण्यात मोठी मदत होते. पहिल्यांदा जमीनवर तुम्ही आरामत बसा, या दरम्यान तुमचे पाय सरळ पसरवा. दोन्ही पाय एकमेकांना लागून असले पाहिजेत, याचं भान ठेवा आणि गुडघ्यांना न वाकवता गोलाकार आकारात फिरवा. दहा वेळेस या आसनाला घड्याळ्याच्या दिशेने फिरवा आणि काही वेळाने घड्याळ्याच्या विरूद्ध दिशेने फिरवा, आणि नंतर सोडून द्या.'

## पांडुरंग आठवले



पांडुरंगशास्त्री आठवले (ऑक्टोबर 19, 1920- ऑक्टोबर 25, 2003) हे मराठी तत्त्वज्ञ होते. ते स्वाध्याय परिवाराचे प्रणेते, संस्थापक होते. त्यांना रेमन मॅगसेसे, टेंम्पलटेंट पुरस्कार, महात्मा गांधी पुरस्कार, लोकमान्य टिळक पुरस्कार, पद्मविभूषण, अशा विविध पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यांचा जन्मदिवस स्वाध्याय परिवार जगभर मनुष्य गौरव दिन म्हणून साजरा करतात.पांडुरंगशास्त्री आठवलेंचा जन्म ऑक्टोबर 19,1920 रोजी रोहे या कोकणातील गावी झाला.

पारंपारिक शिक्षणाबरोबर 'सरस्वती संस्कृत पाठशाळेत' संस्कृत व्याकरणाबरोबर न्याय, वेदांत, साहित्य, त्याचबरोबर इंग्लिश भाषा साहित्याचा अभ्यास पांडूरंगशास्त्री यांनी केला. त्यांना रॉयल ऐशियाटिक सोसायटी मुंबई या संस्थेने सन्माननीय सभासद पद देऊन सन्मानीत केले होते. या ग्रंथालयात त्यांनी कादंबरी विभाग सोडून सर्व मानव्य शाखेतील प्रमुख लेखकांचे, ग्रंथाचे अध्ययन केले. वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे यावर चिंतन केले. इ.स. 1992 मधे त्यांना टिळक पुरस्कार मिळाला तो पुरस्कार देतांना तेव्हाचे राज्यपाल चिदंबरम सुब्रमणियम म्हणाले होते ' विद्वत्ता आणि दैवी शक्तीचा संगम झाल्यावरच समाजाचे आणि देशाचे हित सुरक्षीत राहते. पांडुरंग शास्त्री आठवले यांची शिकवण सर्व समाजाने आचरण्यात आणण्याची गरज आहे. पांडुरंगशास्त्री हे आजच्या युगातील दैदीप्यमान आशेचा किरण आहेत.

## कथा

## लबाड मनुष्याची फजिती

एक कोंबडा आणि एक कुत्रा प्रवास करीत होते. ते एके दिवशी रात्री एका वृक्षाजवळ वस्तीस राहिले. कोंबडा झाडावर चढून बसला व कुत्रा बुंध्यापाशी पडून झोपी गेला.

पहाटेस सूर्योदय झाला त्यावेळी कोंबडा मोठयाने आरवला. तो शब्द ऐकून एक कोल्हा त्या ठिकाणी आला. त्याने पाहिले तो कोंबडा उंच झाडावर बसला आहे.

मग त्यास फसवून मारून खावे, या हेतूने कोल्हा म्हणतो, 'अरे, तुझा स्वर किती मधुर आहे ! तुझे गायन ऐकून मी इतका खूष झालो आहे की, तुला एकदा आलिंगन दयावे असे मला वाटते आहे.' ती त्याची लुच्चेगिरी लक्षात आणून कोंबडा उत्तर करतो, 'गडया, झाडाखाली जो पहारेकरी निजला आहे, त्यास जागा करून दरवाजा उघडण्याविषयी विनंति कर, म्हणजे तुझी माझी भेट होईल.' हे बोलणे कोल्हयास खरे वाटून, त्याने कुत्र्यास हाक मारली.

ती ऐकताच कुत्रा जागा झाला व त्याने एका क्षणात कोल्हयास मारून टाकले.

तात्पर्यः- साधारण लोकांकडूनही लबाड मनुष्याची फजिती झाल्याशिवाय राहत नाही.

## कविता

### बिनभितीची शाळा

बिनभितीची शाळा
हिडू ओढे, धुंडू ओहळ
झाडावरचे काढू मोहळ
चिडत्या, डसत्या मधमाशांशी
जरा सामना करू
बघू बंगला या मुंग्यांचा
सूर ऐकूया त्या भुंग्यांचा
फुलाफुलांचे रंग दाखवित
फिरते फुलपाखरू
बिनभितीची उघडी शाळा
लाखो इथले गुरू
झाडे, वेली, पशू, पाखरे
यांशी गोष्ट करू
भल्या सकाळी उन्हात न्हाऊ
ऐन दुपारी पह्यात पोहू
सायंकाळी मोजू चांदण्या
गणती त्यांची करू
कसा जोंधळा रानी रुजतो?
उंदिरमामा कोठे निजतो ?
खबदाडीतील खजिना त्याचा
फस्त खाऊनी करू
सुग्रण बांधी उलटा वाडा
पाण्यावरती चाले घोडा
मासोळीसम बिनपायांचे
बेडकीचे लेकरू
हलवू झाडे चिटबोरांची
पिसे शोधुया वनी मोरांची
माळावरची बिळे चला रे
काठीने पोखरू

## प्राण्यांची ओळख

## घोडा





मानवाने घोडे माणसाळवून त्यांचा वाहन म्हणून प्राचीन काळापासून उपयोग केला आहे. घोड्यांच्या जगभरात अनेक प्रजाती आहेत. मंगोलिया सारखे काही देश तर तिथल्या आजतागायत अस्तित्वात असलेल्या अश्व-संस्कृतीसाठीच प्रसिद्ध आहेत. जगभरात आढळणा-या घोड्यांच्या काही प्रमुख प्रजाती. अरबी घोडा ध्रुवीय घोडा तट्टू स्कॅंडिनेव्हीयन घोडा भारतीय घोडा थरो ब्रेड घोडा इंग्रजी घोडा अमेरिकन घोडा मंगोलियन घोडा ओस्ट्रेलियन घोडा इ.भारतीय घोडा भारतवर्षाला अश्वारोहणाचा प्रदीर्घ इतिहास आहे. भारतीय उपखंडाची व्याप्ती पूर्वी ब-याच दूरवर पसरलेली असल्याने,आज ज्या प्रजाती स्थानिक प्रदेशाच्या नावाने ओळखल्या जातात जसे की सिंधी घोडा, हे आजही मूळ भारतीय अश्व म्हणूनच ओळखले जातात. भारतीय अश्वांच्या काही प्रमुख प्रजाती खालील प्रमाणे १) सिंधी घोडा २) मारवाडी घोडा ३) काठियावाडी\काठेवाडी घोडा ४) पंजाबी घोडा ५) भिमथडी तट्टू ६) पहाडी तट्टू ७) भारतीय सेना प्रजातीचा घोडा (ही इंग्रजांच्या काळापासून वेगळेपण जपलेली अशी एक संमिश्र अश्व प्रजाती असून या जातीचे घोडे, भारतीय सेना वगळता संपूर्ण जगात कोठेही आढळत नाहीत.

## छोट्यांच्या पाककृती

तुम्हाला सारखी भूक लागलेली असते. ती सुध्दा तुमच्या आवडीच्या पदार्थांची. पण पदार्थाची. पण आई मात्र तुमच्या मनासारखे काही करू देत नाही. खरे आहे ना? मग आपण एक गंमत करू या. तुम्हीच स्वयंपाक घरात शिरून फारशी धडपड न करता काही पदार्थ स्वत:चे स्वतः बनवू शकालात तर? काय म्टलात, जमणार नाही? छे छे अगदी सोपे पदार्थ तुम्हाला बनविता येतील त्यासाठी ते कसे बनवायचे याची साधी सोपी रीत पुढे दिलेली आहे.यात एक गोष्ट मात्र लक्षात ठेवायची गॅस, मिक्सर काही वापरायचे नाही. सुरी, हात न कापता वापरता येत असेल तर ती वापरायची. थोडीशी पूर्वतयारी आई, ताई किंवा स्वयंपाकाच्या काकूंकडून करून घ्यायची. आणि बाकीचे आपण आपले करून घ्यायचे. चला मग. आपण स्वयंपाक घराकडे आपला मोर्चा वळवू या काहीतरी नवीन करण्यासाठी - आणि आवडीचे पदार्थ खाण्यासाठी !'



### कच्च्या केळांचा शिरा

#### साहित्य

- कच्ची केळी - ३ ते ४
- साखर - २५० ग्राम
- तूप - १ कप
- काजू - १/२ कप (बारीक तुकडे केलेले)
- दूध - २ कप
- वेलची - ३ ते ४ (कुटून पूड केलेली)

#### कृती

कच्च्या केळींना धुऊन प्रेशर कुकरमध्ये एकाद कप पाणी टाकून १० मिनिटे (किंवा एक सिटी होईपर्यंत ) शिजून घ्या . तयार केळींची साल काढून वेगळी करा व एकाद प्याल्याने वा चमच्याने चांगले कुस्करून बाजूला ठेवा. एका पॅन मध्ये तूप टाका तूप गरम झाले कि त्यात कुस्करलेली केळी परतून घ्या. त्यात साखर टाका आणि आणखी थोड्या वेळ परता . आता त्यात दूध व काजू टाका व मधून मधून हलवीत जरा घट्ट हिपर्यंत शिजवा . आता त्यात वेलची पावडर टाकून जरा परता . तुमचा कच्च्या केळांचा शिरा तयार आहे , गरमा गरम सर्व करा .

## दिलेल्या चित्रात रंग भरा





दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

• बीड, शुक्रवार, 9 ऑक्टोबर 2026

## परळीत मोबाईल शॉपी फोडून 10.31 लाखांचा मुद्देमाल लंपास

# 75 मोबाईलसह आरोपी परभणीतून जेरबंद!

### संभाजीनगर पोलिसांची दमदार कामगिरी; 250 ते 300 CCTV फुटेज तपासत दोन दिवसांत चोरीचा छडा



**परळी (नितीन ढाकणे)**

परळी शहरातील संभाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल शॉपीचे पत्रे कापून चोरी करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अवघ्या दोन दिवसांत परभणीतून जेरबंद केले आहे. शाहरुख हमीद शेख असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीला गेलेले 75 नवीन व जुने मोबाईल आणि इतर मुद्देमाल असा एकूण 10 लाख 31 हजार 420 रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

चोरीनंतर पोलिसांनी तांत्रिक तपासासोबत परळी रेल्वे स्थानक ते परभणीदरम्यानचे 250 ते 300 CCTV फुटेज तपासले. तपासातून आरोपीचा माग काढत पोलिसांनी परभणीतून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चोरीची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

तसेच आरोपीने माजलगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका चोरीच्या गुन्ह्याचीही कबुली दिल्याने हा गुन्हाही उघडकीस आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संभाजीनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अनमोल केदार व त्यांच्या पथकाने केली.

## निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावरती फौजदारी कारवाई करून बडतर्फ करा काँग्रेसची मागणी



**महागाव | प्रतिनिधी**

निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावरती फौजदारी कारवाई करून त्यांना बडतर्फ करण्यात यावे तसेच एस आय आर रद्द करण्यात यावे या इतर मागण्यांसह केंद्र सरकारला उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्यामार्फत यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष एडवोकेट सचिन नाईक यांच्या नेतृत्वात निवेदन सादर करण्यात आले यावेळी राज्याची माजी मंत्री काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते श्री शिवाजीराव मोघे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे माजी सरचिटणीस श्री तातू देशमुख काँग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री नंदकिशोर अग्रवाल उमरखेड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री अनिल कदम महागाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री शिवाजीराव देशमुख सवनेकर, माजी तालुकाध्यक्ष श्री दत्तराव शिंदे व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थिनीची छेडछाड, आरोपी विरुद्ध विनयभंगा सह अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल आरोपी अटक

**अंबाजोगाई : (प्रतिनिधी)**

अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात एका २० वर्षीय विवाहित तरुणीने दिलेल्या जबाबात महाविद्यालयीन काळातील ओळखीच्या तरुणाकडून प्रेमसंबंधासाठी पाठलाग व त्रास दिल्याचा आरोप केला आहे. याबाबतचा जबाब तिने दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलिसांसमोर नोंदविला आहे.

तरुणीच्या जबाबानुसार, तिचे शिक्षण अंबाजोगाई येथील नर्सिंग महाविद्यालयात सुरू असताना तिची कृष्णा मारुती केंद्रे याच्यासह काही विद्यार्थ्यांशी मैत्री होती. महाविद्यालयीन ओळखीचा फायदा घेत कृष्णा याने दि. १ जानेवारी २०२५ रोजी सार्वजनिक ठिकाणी प्रेम करण्याबाबत विचारणा केली होती. मात्र, तिने त्यास नकार दिल्यानंतरही तो वारंवार पाठलाग करून त्रास देत असल्याचे तिने जबाबात नमूद केले आहे.

तसेच, “तू सतरा पोरांना फिरवतेस व मला प्रेम करण्या बाबत नाही बोलतेस ” अशा स्वरूपाचे बोलणे केल्याचा आरोपही तरुणीने केला आहे. महाविद्यालयात मुलींबाबत तसेच तिच्याबाबत काही टिप्पणी केल्याने तिने संबंधित विद्यार्थिनीला याची माहिती दिल्याचेही जबाबात म्हटले आहे. सध्या संबंधित विदयार्थिनीने नर्सिंग शिक्षण बंद केले असून कृष्णा केंद्रे याच्याशी कोणताही संपर्क नसल्याचे तरुणीने स्पष्ट केले आहे. याप्रकरणी सदर पीडित विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनमध्ये विनयभंगासह अ‍ॅट्रॉसिटी चा गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणातील आरोपीस अटक करण्यात आले असून उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांकडून तपास सुरु आहे.



## कोलाज कला प्रकारात ओम तिडके याचे उल्लेखनीय यश

### आंतरमहाविद्यालयीन केंद्रीय युवक महोत्सवात वैद्यनाथ कॉलेजच्या विद्यार्थ्याला तृतीय पारितोषिक

**परळी वैजनाथ** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक ५, ६ व ७ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन केंद्रीय युवक महोत्सवात वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथच्या विद्यार्थ्याने आपल्या कलागुणांची प्रभावी छाप उमटवत महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयाच्या बी.एस्सी. तृतीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या ओम शिवाजी तिडके या विद्यार्थ्याने कोलाज या कला प्रकारात उत्कृष्ट कलाविष्कार सादर करून तृतीय पारितोषिक पटकावले.

युवक महोत्सवातील कोलाज या कला प्रकारात ओम तिडके याने सादर केलेल्या कलाकृतीने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. कल्पक मांडणी, विषयाची प्रभावी अभिव्यक्ती, कलात्मक दृष्टिकोन तसेच उपलब्ध साहित्याचा सर्जनशील वापर या बाबींमुळे त्याच्या कलाकृतीला उल्लेखनीय यश मिळाले.

ओम तिडके याने मिळविलेल्या या यशाबद्दल वैद्यनाथ कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. डी. राठोड यांनी त्याचे अभिनंदन करून सत्कार केला. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक व इतर विविध क्षेत्रांमध्ये सहभागी होऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले. ओम तिडके याने मिळविलेले यश हे इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी असून त्याच्या पुढील वाटचालीसाठी प्राचार्य डॉ. राठोड यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



तसेच आगामी इंद्रधनुष्य स्पर्धेसाठी ओम तिडके याला शुभेच्छा देण्यात आल्या. युवक महोत्सवाच्या पुढील टप्प्यातही त्याने उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. वीरश्री आर्या यांच्यासह सांस्कृतिक विभागातील सहकारी डॉ. एस. व्ही. किरवले, डॉ. गया मस्के, डॉ. एस. पी. गुट्टे, प्रा. दिलीप गायकवाड आणि डॉ. रा. ज. चाटे उपस्थित होते. सर्वांनी ओम तिडके याचे अभिनंदन करून त्याच्या कलात्मक प्रतिभेचे कौतुक केले. तसेच आगामी स्पर्धांमध्येही आत्मविश्वासाने सहभागी होऊन यश संपादन करण्यासाठी त्याला शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना विविध कला प्रकारांमध्ये सहभागी होण्यासाठी सातत्याने प्रोत्साहन दिले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून ओम तिडके याने युवक महोत्सवात मिळविलेले हे यश महाविद्यालयाच्या सांस्कृतिक क्षेत्रातील वाटचालीसाठी निश्चितच अभिमानास्पद ठरले आहे.

ओम तिडके याच्या या यशाबद्दल वैद्यनाथ कॉलेजच्या प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांकडून त्याचे अभिनंदन करण्यात येत असून, आगामी इंद्रधनुष्य स्पर्धेतही तो उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे

## जिल्हास्तरीय रंगभरण व चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**अंबाजोगाई** : महाराष्ट्र शिक्षण संस्था, मोहा संचलित सृजन प्राथमिक विद्यालय व श्री सांडेश्वर विद्यालय, चनई, ता. अंबाजोगाई, जि. बीड यांच्या वतीने ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व माजी खासदार कॉ. नानाधरअण्णा बुरांडे यांच्या स्मृती दिनानिमित्त जिल्हास्तरीय रंगभरण व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी सृजन प्राथमिक विद्यालय व श्री सांडेश्वर विद्यालय, चनई येथे होणार आहे. रंगभरण स्पर्धा सकाळी ९ ते १० या वेळेत, तर चित्रकला स्पर्धा सकाळी ९ ते १०.३० या वेळेत घेण्यात येणार आहे.

रंगभरण स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचे अ, ब, क , ड गट करण्यात आले असून, गट अ मध्ये पहिली व दुसरी, गट ब मध्ये तिसरी व चौथी, गट क मध्ये पाचवी व सातवी तसेच गट ड मध्ये आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.



स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी १,१०० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७०० रुपये व तृतीय क्रमांकासाठी ५०० रुपये तसेच ट्रॉफी व प्रशस्तिपत्र देण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येक गटातून पाच उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १०० रुपये व प्रशस्तिपत्रासह देण्यात येणार आहेत. स्पर्धेच्या दिवशीच पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रति विद्यार्थी १० रुपये प्रवेश शुल्क असून, रंगभरणासाठी एक तास व चित्रकलेसाठी दीड तास वेळ देण्यात येणार आहे. रंगभरणासाठी आवश्यक रेखाकृती आयोजकांकडून, तर चित्रकलेसाठी विषय आयोजकांकडून दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांनी स्पर्धेसाठी लागणारे इतर साहित्य, रंग आदी सोबत आणावेत. प्रत्येक स्पर्धेसाठी नोंदणी करणे अनिवार्य असून, १० ऑक्टोबर रोजी दीड तास अगोदर नोंदणीची अंतिम मुदत देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, सर्जनशीलतेला चालना मिळावी आणि ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक कॉ. गंगाधरअण्णा बुरांडे यांच्या कार्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

- **स्पर्धेसाठी संपर्क** :
- **कांबळे बी.एच. – ८८८२७९१९१**
- **स्वामी पी.वाय. – ८६६८२२३८८०**
- **चव्हाण पी.एन. – ९४२१४४३१७२**
- **बोकेन आर.जी. – ९४२१३४६२२६**